नि.फौ.ख.क्र.६/२०२२
शासन विरुध्द उत्तम
नि.क्र.१०६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५**

मी देवाची शपथ खरे सांगते की,
माझे नाव — राखी अजित कदम,
वय — ४४ वर्षे, कामधंदा - गृहिणी,
नेमणुक— सटालेवाडी पो. परखंदी, ता. वाई, जि.सातारा

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. आर. सुळ -**

मी माझ्या घरी माझ्या पती व मुलगा गौरव यांच्यासह वरील पत्त्यावर राहते. दि.२४.१०.२०२१ रोजी माझ्या पतीच्या कानात दुखत असल्याने ते त्यात औषध टाकून आमच्या घराच्या शेडमध्ये दुपारी १.०० वाजताच्या सुमारास झोपलेले होते. त्यावेळी मी घर झाडत होते. मला आरडाओरडा ऐकला आला त्यामुळे मी शेडच्या दिशेने गेले. मी ज्याठिकाणी झाडलोट करीत होते तेथून थोडया अंतरावर पुढे गेल्यावर मला सहजपणे ते शेड दिसत होते. त्यावेळी मी पाहिले की आरोपी उत्तम कदम यांच्या हातात लोखंडी हातोडा होता. त्यास लाकडी मुठ होती. तसेच आरोपी राजन कदम यांच्या हातात मोठ्ठे कळकाचे दांडके होते. आरोपी उत्तम कदम याने माझ्या पतीच्या डोक्यात हातोडा मारला, त्यामुळे ते खाली पडले, त्यांना नीट श्वास सुध्दा घेता येत नव्हता. माझे पती अजित तात्याबा कदम हे खाली पडलेले असताना आरोपी राजन याने त्याच्या हातातील कळकाच्या दांडक्याने पाठीवर, हातावर मारहाण करायला सुरुवात केली. तो त्यांना मारतच होता. त्यावेळी तेथे आरोपी राजन व उत्तम यांच्यासह आणखी दोघेजण होते. त्यांची नावे रोहिदास काटकर व शंकर निकम अशी होती. मी घटनास्थळाकडे धाव घेतली आणि आरोपींना म्हणू लागले की तुम्ही त्यांना कशाला मारताय. ते त्यावर मला म्हणाले की, ''तुला घर पाहिजे ना मग घे घर तुला''. माझ्या पतींना श्वास घेण्यास त्रास होत असल्याने ते धडपडत होते. त्यामुळे ते पाहून आरोपी तेथून पळून गेले. त्यानंतर मी माझ्या पतींना आमच्या घरच्या गाडीवरून म्हणजेच अॅक्टीवा वरुन पोलीस ठाणे वाई येथे आले. तेथे पोलीसांनी आम्हाला मेडीकल यादी दिली व सरकारी दवाखान्यात उपचाराकरीता पाठविले. त्याप्रमाणे आम्ही ग्रामीण रुगणालय वाई येथे गेलो. तेथे माझ्या पतीवर उपचार करण्यात आले. त्यानंतर त्याचदिवशी सायंकाळी ५.०० वाजताचे सुमारास पोलीस

ठाणे वाई येथे आलो. तेथे माझ्या पतीने घटनेची फिर्याद दिली. त्याचदिवशी सायंकाळी ६.०० च्या सुमारास मी घरी परतल्यावर पोलीस तेथे आले व त्यांनी मला घटनेच्या अनुषंगाने विचारपूस केली. माझे पती त्यावेळी घरी आले नव्हते, तर ते घोटवडेवर हॉस्पीटल वाई येथे पुढील उपचाराकरीता गेले होते. पोलीसांना मी घटनास्थळ दाखविले होते. त्याठिकाणी पोलीसांनी जेथे रक्त सांडले होते त्याचा फोटो काढला. तसेच ज्या हत्यारांनी माझ्या पतीला मारहाण करण्यात आली होती. त्याबाबत सुध्दा मला विचारणा केली. ती हत्यारे तेथेच पडलेली होती. मी ती पोलीसांना दाखविली होती. पोलीसांनी माझे तपासटिपण नोंदविले होते. मला ती हत्यारे दाखविल्यास मी ते ओळखू शकते. आता मला आर्टीकल ए वरील हातोडी व आर्टीकल बी वरील कळकाचे दांडके दाखविण्यात आले, ते तेच आहेत. मी आरोपींना ओळखते. त्यापैकी आरोपी उत्तम तात्याबा कदम, रोहिदास काटकर व शंकर निकम हे मयत आहेत. आरोपी राजन कदम आजरोजी न्यायालयात हजर नाही. (नि.क्र.१०५ वरील आदेशानुसार आरोपीची आजची गैरहजेरी माफ करण्यात आली.)

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. एस. गजरे-**

२. आरोपी क्र. ४ राजन कदम हा माझा पुतण्या आहे. तसेच आरोपी क्र.१ उत्तम हे माझे दिर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्या कुटुंबात दिवाणी वाद सुरु होते. हे म्हणणे खरे नाही की, कथित घटनेच्यावेळी मी माझ्या घरातच होते. हे म्हणणे खरे आहे की, मला गोंधळाचा आवाज आल्यानंतर मी घराबाहेर आले होते. हे म्हणणे खरे नाही की, कथित घटना घडताना मी तेथे हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, जर एखाद्या व्यक्तीस लोखंडी हातोडीने मारहाण केल्यास ती व्यक्ती गंभीररित्या जखमी होवू शकते. माझे घर ते पोलीस ठाणे वाई हे सात किलोमीटर अंतर आहे. तेथे वाहनाने पोहोचण्याकरीता बावीस मिनीटे लागतात.

३. माझ्याकडे कथितरित्या असलेल्या अॅक्टीवा गाडीचे कागदपत्रे पोलीसांनी माझ्याकडून हस्तगत केले नव्हते. कथित फिर्याद अंदाजे सायंकाळी ५.५५ वाजता देण्यात आली होती. तत्पूर्वी आम्ही फिर्याद दाखल करू शकलो नव्हतो कारण पोलीसांनी सर्वप्रथम आम्हाला उपचाराकरीता दवाखान्यात पाठविले होते.

४. आता मला माझे तपासटिपण दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये आरोपींनी मला ''तुला घर पाहिजे ना मग घे घर तुला'' असे म्हटल्याचा मजकुर नमुद नाही. त्याचप्रमाणे माझे पती श्वास घेण्याकरीता धडपडत होते असा उल्लेखदेखील त्यामध्ये नाही. माझ्या जबाबात माझे पती घोटवडेकर हॉस्पीटल येथे जावून उपचार घेतल्याचे नमुद नाही.

५. आमचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आमच्याकडे फावडे, कुदळ इत्यादी शेतीउपयोगी अवजारे उपलब्ध असतात. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्याचा वापर करताना कधीकधी दगड उडून दुखापतसुध्दा होवू शकते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही कथित घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझे पती असल्याने मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पांडुरंग बजरंग वाडकर हे माझे गावकरी असून माझी त्यांच्याशी ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यात व आरोपीमध्ये असलेल्या दिवाणी वादांवरून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2026.01.12 15:01:08 +0530

दि.१२.०१.२०२६

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वाई.